अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. COEP(जंबो)/३९
दिनांक - २४।०९।2020

## -: आज्ञापत्रक :-

**विषय:** COEP जंबो हॉस्पिटल येथील सनियंत्रणाबाबत.
**संदर्भ :-** अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) कार्यालय जा.क्र. COEP(जंबो)/०२ दि. ०५/०९/२०२० चे सुधारित आदेश.

पुणे शहरातील कोरोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेवून महाराष्ट्र शासन, पुणे महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे संयुक्त प्रयत्नाने COEP जंबो हॉस्पिटलची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर हॉस्पिटलमधील वाढती रुग्णसंख्या व हॉस्पिटलमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांवर त्वरित व आवश्यक ते उपचार होण्यासाठी व रुग्णालयातील सर्व कामकाजासाठी नियुक्त केलेल्या संबंधित यंत्रणा यांचे कामांवर देखरेख, नियंत्रण व समन्वय साधून जंबो रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज प्रभावीपणे व सुरळीत चालण्यासाठी श्री. राजेंद्र मुठे – समन्वय अधिकारी, COEP जंबो हॉस्पिटल यांना सहाय्य करण्यासाठी संदर्भांकित सुधारित आदेश काढण्यात आले होते.

सद्यस्थितीत COEP जंबो हॉस्पिटल येथील समन्वयाचे कामकाज सुरळीत चालू असून अतिरिक्त नेमण्यात आलेले अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांची आवश्यकता नसून संदर्भांकित आदेशान्वये नेमण्यात आलेले अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे.

COEP जंबो हॉस्पिटल येथील उपरोक्त अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांचे कामकाज या आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०२ कार्यालय व महापालिका सहाय्यक अधिकारी, शिवाजीनगर – घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय यांनी पहावयाचे असून त्यांनी दररोज सकाळी व सायंकाळी सदर हॉस्पिटलला प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित नियुक्त यंत्रणांशी चर्चा करावी. तेथील अडी अडचणी, प्रश्न पुणे मनपाशी संबंधित प्रश्न हे संबंधित विभागाशी संपर्क साधून सोडविण्यात यावेत. तसेच केंद्रातील स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था, सुव्यवस्था, व्यवस्थापन व अन्य बाबी यांची पाहणी करून आवश्यकतेनुसार सनियंत्रण व समन्वयाचे कामकाज करावे.यामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) *तथा*
अध्यक्षा, कार्यकारी समिती,
COEP कोविड हॉस्पिटल,
पुणे महानगरपालिका

प्रत : १. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

यांजकडेस माहितीस्तव सादर...

२. उप आयुक्त,

परिमंडळ क्र. २, पुणे महानगरपालिका

३. महापालिका सहाय्यक आयुक्त,

घोलेरोड-शिवाजीनगर क्षेत्रीय कार्यालय

पुणे महानगरपालिका

४. संबंधित अधिकारी